T3_L2

# क्रांतियुग


- औदयोगिक क्रांती
- अमेरिकेचे स्वातंत्र्ययुध्द
- फ्रेंच राज्यक्रांती

# अमेरिकेचे स्वातंत्र्ययुध्द

- नव्या भूमीचा शोध
- अमेरिकेतील ब्रिटिश वसाहती
- वसाहतवाल्यांच्या हालचालींवर नियंत्रण
- नवे कर व इतर बंधने
- बोस्टन टी पार्टी
- युध्दाचे सावट
- वसाहतवाल्यांच्या प्रतिनिधी परिषदा
- स्वातंत्र्ययुध्दाचे परिणाम
- जॉर्ज वॉशिंग्टन
- थॉमस पेन यांचे वैचारिक लेखन व त्याचा परिणाम
- विचारवंतांची कामगिरी

## ❖ नव्या भूमीचा शोध –

- पूर्वेला अटलांटिक महासागर आणि पश्चिमेला प्रशांत महासागर यामुळे अमेरिका खंड अनेक शतके जगापासून वेगळा होता.
- ख्रिस्तोफर कोलंबस, जॉन कॅबेट आणि अमेरिगो व्हेस्पुसी यांच्या प्रयत्नामुळे अमेरिका खंडाचा शोध लागला.
- हा शोध १५ व्या शतकात लागला.
- युरोपमधील स्पेन, इंग्लंड, फ्रान्स आणि पोर्तुगाल या देशांनी अमेरिकेत आपल्या वसाहती निर्माण केल्या.



जॉन कॅबेट



अमेरिगो व्हेस्पुसी

T3_L2_A1

## ❖ ख्रिस्तोफर कोलंबस –

- कोलंबसने अमेरिका खंडाचा शोध लावला.
- हा शोध लावत असताना त्याच्या आयुष्यात अनेक गोष्टी घडल्या.
- त्याच्या आयुष्यातील ही कथा.

शोधमोहीम चालू असताना कोलंबस व सहकाऱ्यांचा मुक्काम एका खेडे गावात पडला. जवळचा दाणा-गोटा संपलेला. उपाशी मरण्याची वेळ आलेली. काहीतरी युक्ती शोधण्याची प्रचंड गरज होती. एकदम कोलंबसच्या बुध्दीला लागलेले ग्रहण सुटले व त्याला कल्पना सुचली.



ख्रिस्तोफर कोलंबस

T3_L2_A1

गावातील सर्व लोकांना एकत्र बोलविण्यात आले. कोलंबसने त्या सगळयांना अगोदरपासूनच दमात घेतले व सांगितले की आज रात्री ५० पोती धान्य जर मला मिळाले नाही, तर आकाशातील चंद्राला मी पळवून नेईन. चंद्र पळविण्याची कल्पनाच नावीन्यपूर्ण असल्याने सर्व ग्रामस्थांनी त्याला वेड्यात काढले पण कोलंबस स्वत:च्या बोलण्यावर ठाम होता दिवस ढळला. संध्याकाळ झाली, रात्र जवळ आली तरी चंद्राचा पत्ताच नाही. चंद्राचा आणि कोलंबसचा कोप आपल्यावर होऊ नये म्हणून ग्रामस्थांनी तत्काळ धान्यपुरवठा केला.

T3_L2_A1

तो धान्यसाठा घेऊन ताबडतोब रात्रीच्या रात्री कोलंबस त्या गावातून पसार झाला. तो दिवस चंद्रग्रहणाचा होता हे फक्त कोलंबसलाच माहीत होते. अन्य कोणालाच माहित नसल्यामुळे कोलंबसच्या जीवावरील संकट टळले आणि तो पुढील कामासाठी मार्गस्थ झाला.

- इंग्लंडने अमेरिकेत १३ वसाहती स्थापन केल्या.
- या १३ पुढील प्रमाणे – व्हर्जिनिया, मॅसॅच्युसेटस्, न्यू हॅमशायर, ऱ्होड आयलंड, कनेक्टीकट, न्यूयॉर्क, न्यूजर्सी, पेनसिल्व्हानिया, डिंलावेअर, मेरीलॅंड, उत्तर कॅरोलिना, दक्षिण कॅरोलिना, जॉर्जिया.
- या वसाहतींत विविध प्रकारचे लोक स्थायिक होते.
- त्यामध्ये स्थानिक लोक, गुलाम, इंग्रज, आयरिश, जर्मन, डच, पोतुगीज इ. युरोपियन लोकांचा एक संमिश्र समाज निर्माण झाला.


१३ ब्रिटिश वसाहती
क्यूबेक
लेक सुपिरीयर
(क्यूबेक)
ब्रिटिश साम्राज्य
मॉन्टेरीयाल
Maine
(Parts of Mass.)
लेक ह्युरॉन
लेक मिशिगन
लेक ऑन्टारीओ
न्यू
हॅम्पशायर
पोर्टस्माउथ
बोस्टन
न्यूयॉर्क
मॅसॅचुसेटस खाडी
प्रोव्हीडन्स
कनेक्टीकट
र्‍होड बेट
लेक इरी
न्यू हेवन
पेनसिल्व्हानीया
न्यूयॉर्क सिटी
ट्रेन्टॉन
फिलाडेल्फीया
न्यू जर्सी
PROCLAMATION LINE OF 1763
मेरीलॅन्ड
डेला वेअर
अनापोलिस
अटलांटिक
महासागर
ब्रिटिश साम्राज्य
व्हर्जिनिया
विलयमबर्ग
उत्तर कॅरोलीना
न्यू बर्न
उ
दक्षिण कॅरोलीना
चार्लस्टोन
जॉर्जिया
सव्हाना
० २०० ४००
कि.मी.

T3_L2_A2

# ❖ अमेरिकेतील ब्रिटिश वसाहती –

- अमेरिकेतील मूळचे रहिवासी असणारे रेड इंडियन व इंग्रज यांच्यात सीमा तंटे निर्माण झाले.
- वसाहतींना अनुरुप अशी प्रशासकीय व्यवस्था उभारावी लागली.
- वसाहतींचा कारभार हा ब्रिटिश शासनाने नियुक्त केलेला गव्हर्नर स्थानिक प्रतिनिधींच्या सल्ल्याने पाहत असे.



रेड इंडियन

- प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कालांतराने प्रांतिक विधीमंडळे निर्माण झाली.
- विधीमंडळ करविषयक व अन्य कायदे संमत करत असत.
- त्यामुळे शेती व व्यापार या क्षेत्रावर नियंत्रण आले.
- वसाहतीत मोठया प्रमाणात इंग्लंडमधीलच लोक राहत होते.
- त्यामुळे वसाहतवाल्यांवर इंग्लंडचे वर्चस्व होते.

T3_L2_A3

## ❖ वसाहतवाल्यांच्या हलचालींवर नियंत्रण –

- इंग्लंड व फ्रान्स यांच्यात उत्तर अमेरिकेतील काही प्रदेश आणि ओहिओ यांच्या काही प्रदेशासाठी युध्द झाले.
- या युध्दाला सप्तवार्षिक युध्द म्हणतात.
- इ.स. १७५६ ते १७६३ या काळात हे युध्द अमेरिका व युरोप या दोन खंडात लढले गेले.
- पॅरिसच्या तहाने या युध्दाचा शेवट झाला.
- या तहातून इंग्लंडला फ्रान्सकडून कॅनडा आणि ॲपलेशियन पर्वत व मिसिसिपी नदीच्या दरम्यानचा सर्व प्रदेश मिळाला.

T3_L2_A3

- फ्रान्सचा पराभव झाल्याने वसाहतवाल्यांना फ्रान्सच्या आक्रमणाची भीती राहिली नाही, तसेच इंग्लंडच्या मार्गदर्शनाची व संरक्षणाची गरज राहिली नाही.
- वसाहतवाल्यांना असे वाटू लागले की आपण आपला राज्यकारभार पाहण्यास समर्थ आहोत.
- या गोष्टीमुळे वसाहती बंडास प्रवृत्त झाल्या.

T3_L2_A3

# वसाहतींचा सागरी व्यापार



T3_L2_A4

## ❖ वसाहतींचा व्यापार –

१. वसाहतींची वाहतुक व व्यापार इंग्लंडच्याच बोटीतून चालत असे.
२. वसाहतींना स्वतंत्र बोटी नव्हत्या.
३. वसाहतींनी कच्चा माल इंग्लंडलाच विकावा व पक्का माल तयार करु नये असे त्यांच्यावर बंधन होते.
४. वसाहतींनी आयात केलेला माल प्रथम इंग्लंडच्या बंदरावर उतरवून तो नंतर वसाहतीत जावा. अशी वसाहतींवर सक्ती होती.

T3_L2_A5

## ❖ नवे कर व इतर बंधने –

- सप्तवार्षिक युध्दाने इंग्लंडची आर्थिक घडी विस्कटली.
- त्याची भरपाई वसाहतवाल्यांकडून विविध करांच्या रुपात करुन घेताली जात होती.
- त्यासाठी इंग्लंडने वसाहत- वादयांवर विविध कर लादले. ते कर पुढील प्रमाणे –

१. शुगर ॲक्ट १७६४ – या कायदयाने अमेरिकेत आयात होणारी साखर, रेशीम, कॉफी इत्यादींवर कर लादण्यात आले.

२. स्टॅम्प ॲक्ट १७६५ – हा कायदा अन्यायकारक ठरला. यामुळे वर्तमानपत्रे, विमा कर, परवाने व खेळण्याच्या पत्त्यांवरही कर आकारला जाऊ लागला.

T3_L2_A5

- ब्रिटिश संसदेने प्रथमच व्यापक स्वरुपाचा कर लादल्यामुळे अमेरिकेत तीव्र असंतोष निर्माण झाला.
- “स्वातंत्र्यदेवतेचे पुत्र’ या नावाने संघटन करुन वसाहतवाल्यांनी स्टॅंप अ‍ॅक्टचा धिक्कार केला.
- या कायद्याचा निषेध म्हणून इंग्लंडच्या राज्यघटनेवर टीका करण्यात आली.
- ब्रिटिशांच्या मालावर बहिष्कार टाकण्यात आला.
- वसाहतीत कायदेभंगाच्या चळवळी सुरु झाल्या.
- त्यामुळे इंग्लंडला हा कायदा रद्द करणे भाग पडले.

- प्रतिनिधींच्या संमतीशिवाय कर लादणे हा शुध्द जुलूम आहे.
- असे जेम्स ओटीस हा वकील म्हणाला.
  वसाहतवाल्यांनी “ना प्रतिनिधी ना कर” अशी घोषणा केली.

३. टाऊनशेंड ॲक्ट १७६७ –

- इंग्लंडच्या संसदेने हा कायदा करुन चहा, साखर, कागद, रंग, शिसे इत्यादी अनेक वस्तूंच्या आयातीवर कर लादले.
- पुन्हा एकदा वसाहतवाल्यांनी निषेध चळवळ केली.
- त्यामुळे इंग्लंडला हा कायदा मागे घ्यावा लागला.

T3_L2_A5

- इंग्लंडची ईस्ट इंडिया कंपनी आर्थिक संकटात सापडली होती.
- तिला वाचवण्यासाठी संसदेने १७७३ मध्ये एक कायदा केला.
- या कायदयानुसार ईस्ट इंडिया कंपनीला अमेरिकेशी चहाचा व्यापार करण्याची मक्तेदारी प्राप्त झाली.
- या कायदयाचा निषेध म्हणून अमेरिकन लोकांनी चहावर बहिष्कार टाकला.
- चहाऐवजी कॉफी पिणे हे अमेरिकेत देशप्रेमाचे लक्षण बनले.
- या कायद्यामुळे “बोस्टन टी पार्टी” म्हणून ओळखली जाणारी घटना घडून आली.

# Assessment

- योग्य जोडया लावा.

| अ गट | ब गट |
|---|---|
| १. स्टॅप ॲक्ट | १. आयरिश |
| २. इंग्लंड | २. १७६७ |
| ३. अमेरिकेचे मूळ रहिवासी | ३. तेरा वसाहती |
| ४. टाऊनशेंड ॲक्ट | ४. रेड इंडियन |
| | ५. १७६५ |

1 – 5 , 2 – 3 , 3 – 4 , 4 – 2

# Exercises

T3_L2_A6

- खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. अमेरिका खंडाचा शोध कोणी लावला?
२. इंग्लंडने अमेरिकेमध्ये किती वसाहती स्थापन केल्या?
३. कोणत्या तहाने सप्तवार्षिक युध्द थांबले?
४. शुगर ॲक्ट कोणत्या साली करण्यात आला?

- इंग्लंडने अमेरिकेवर लादलेल्या विविध करांची अधिक माहिती गोळा करुन तुमच्या शब्दात लिहा.
- आपल्या घरी येणाऱ्या महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यांच्या टॅक्स पावतीवर कोणकोणते कर असतात याची माहिती पालकांच्या मदतीने घ्या.
- चित्रपटाच्या तिकिटांवर कोणता कर असतो हे बघा.

T3_L2_A6

# उत्तरे

- खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. अमेरिका खंडाचा शोध ख्रिस्तोफर कोलंबस, जॉन कॅबेट आणि अमेरिगो व्हेस्पुसी यांनी लावला.
२. इंग्लंडने अमेरिकेमध्ये तेरा (१३) वसाहती स्थापन केल्या.
३. पॅरीसच्या तहाने सप्तवार्षिक युध्द थांबले.
४. शुगर अॅक्ट १७६४ साली करण्यात आला.